# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे

फोन नं. ०२२-२९४५१००१.

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट ०९-२३ दिनांक १०/०१/२०२३

## एंजल पॅलेस (खुशी) ऑर्केस्ट्रा बारवर कारवाई-अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांची कामगिरी.

दिनांक ०९.०१.२०२३ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष भाईंदर पथकास गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, एंजल पॅलेस (खुशी) ऑर्केस्ट्रा बार, पत्ता चंद्रेश ॲकॉर्ड, सिल्वर पार्क, मिरा-भाईंदर रोड, मिरारोड पुर्व या बारच्या हॉलमध्ये महिला वेटरच्या नावाखाली परवाना नसतांना मुलींकडून नृत्य करवुन घेत असुन सदर बारचे मालक/चालक, मॅनेजर, कॅशिअर, स्टीवर्ड, पुरुष सिंगर/वादक व वेटर हे मुलींना नृत्य करण्यास प्रोत्साहीत करुन नृत्य करण्यास भाग पाडत आहेत.

प्राप्त गुप्त बातमीच्या अनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष भाईंदर पथकाचे पोलीस निरीक्षक समीर अहिरराव यांनी कायदेशीर बाबींची पुर्तता करुन बोगस गिऱ्हाईक पाठवून सत्यता पडताळुन रात्री १२:०० वाजताच्या सुमारास एंजल पॅलेस (खुशी) ऑर्केस्ट्रा बारमध्ये पोलीस पथक व दोन पंचासह छापा कारवाई केली असता हिंदी गाण्याच्या व वाद्याच्या तालावर महिला सिंगर अश्लिल नृत्य करीत असल्याचे निदर्शनास आले. तसेच बारचे मालक, चालक/मॅनेजर, कॅशियर, वेटर, पुरुष सिंगर/वादक हे बारमधील महिला सिंगर यांना नृत्य व अश्लिल नृत्य करण्यास बंदी असताना नृत्य करण्यास भाग पाडुन प्रोत्साहित करीत असताना मिळुन आल्याने कारवाई करण्यात आली. सदर कारवाई दरम्यान रोख रक्कम ३७,२००/- रु व इतर मुद्देमाल जप्त करुन नमुद बार आस्थापनेचे मॅनेजर-०२, कॅशियर-०१, स्टीवर्ड-०१, वेटर-०५ पुरुष सिंगर/वादक-०१, असे एकुण १० इसमांना ताब्यात घेण्यात आले तसेच पळुन गेलेले स्टीवर्ड मनोज श्यामदेव साव, वय-२७ वर्ष, वेटर-अनिलकुमार रामदेव सिंह, वय-२५ वर्ष, पाहिजे आरोपी मालक सत्या शेट्टी, रा. ठाणे व तपासात निष्पन्न होणारे इतर चालक यांच्याविरुध्द सपोउपनि उमेश हरी पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन मिरारोड पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. क्र. १०/२०२३ महाराष्ट्र हॉटेल, उपहारगृहे आणि मद्यपान कक्ष (बाररुम) यामधील नृत्य व अश्लिल नृत्यावर प्रतिबंध घालण्याबाबत व (त्यामध्ये काम करणा-या) महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम -२०१६ चे कलम ३, ८ (१) (२) प्रमाणे दिनांक १०.०१.२०२३ रोजी दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. समीर अहिरराव, स.फौ. उमेश पाटील, पो.शि. केशव शिंदे, चा.पो.हवा. सम्राट गावडे, महिला म.सु.ब. अपर्णा गायकवाड, सर्व नेम. अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष भाईंदर यांनी केली आहे.